तरुण भारत
सोमवार, २ जून २०२५

# विद्यार्थ्यांना मदत, माणसं जोडणं हीच सेवाभावी वृत्ती : डॉ. कुंभार

**कोल्हापूर :** सेवाभाव माणसाला घडवीत असतो. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी संस्था स्थापनेच्या माध्यमातून सुसंस्कारी आणि ज्ञानी विद्यार्थी घडवले. सेवाभाव आणि मानवतावादी मूल्यांच्या रुजवणुकीसाठी त्यांनी समर्पणाची वृत्ती गुरुदेव कार्यकर्त्यांत निर्माण केली. त्यामुळेच असे अनेक गुरुदेव कार्यकर्ते निर्माण झाले, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. ते शिवाजी माने यांच्या सेवानिवृत्ती समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने सुरूवात झाली. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. कुंभार यांच्या हस्ते शिवाजी माने यांचा सत्कार करण्यात आला. शिवाजी माने म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थेप्रती ऋणभाव व्यक्त केला. स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या मुळेच माझे आयुष्य घडले. भालचंद्र माने, प्रा. डी. बी. पुजारी, आर. व्ही. सदाफुले यांनी मनोगत व्यक्त केले. मानपत्राचे वाचन अधीक्षक संजय दळवी यांनी केले. प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी केले. आभार बी. आर. करपे यांनी मानले. सुत्रसंचालन अमर जाधव यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

2/6/25

लोकमत
कोल्हापूर, सोमवार, दि. २ जून २०२५

# अवघं शहर 'सायकल'वर ; 'ग्रीन' कोल्हापूरचा नारा बुलंद

## 'लोकमत'ची ग्रीन कोल्हापूर सायकल राईड' उत्साहात : हजारोंच्या संख्येने सायकलप्रेमी सहभागी

लोकमत GREEN KOLHAPUR CYCLE RIDE

Powered by DYP · SAYAJI · MAX PROTEIN · Aster AADHAR HOSPITAL

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हिरवाई नटलेल्या कोल्हापूरचे निसर्गसौंदर्य जपण्यासाठी जनजागृती व्हावी, या उद्देशाने 'लोकमत'तर्फे रविवारी सकाळी आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड'मध्ये हजारो आबालवृद्ध, युवक, युवती व बालचिमुकल्यांनी सहभाग घेत 'ग्रीन कोल्हापूर'चा नारा बुलंद केला. शहरातील कचरा, वाढते प्रदूषण रोखण्याच्या दृष्टिकोनातून जनजागृती करण्यासाठी 'लोकमत'ने 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड' आयोजित केली होती. हॉटेल सयाजी येथून या राईडला सुरुवात झाली. जिल्हाधिकारी अमोल येडगे, 'लोकमत'चे सहायक उपाध्यक्ष मकरंद देशमुख, हॉटेल सयाजीचे जनरल मॅनेजर मुकेशकुमार रक्षित, 'ॲस्टर आधार'चे संचालक डॉ. संजय देशपांडे, सी. ए. असोसिएशनचे सेक्रेटरी अलोक शहा, मॅक्स प्रोटिनचे आकाश मोरे, डिकॅथलॉनचे सूरज जेके, बिबग्योर हायस्कूलचे प्रिन्सिपॉल प्रवीण शर्मा, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलचे अध्यक्ष संजय भगत, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, 'रग्गेडियन'चे आकाश कोरगावकर, उद्योजक उत्तम फराकटे, डेक्कन स्पोर्ट्सचे उदय पाटील, आयर्नमॅन सूरज चव्हाण यांच्या उपस्थितीत राईडचा फ्लॅग ऑफ करण्यात आला. राईडच्या सुरुवातीपासूनच युवक, युवती, आबालवृद्ध सायकलपटूंमध्ये उत्साह संचारला होता.

युवकांनी देशी-परदेशी बनावटीच्या सायकलींसह जनजागृती करणारे संदेशाचे फलक झळकावत जनजागृतीचा संदेश दिला. जिल्ह्यातील विविध सायकल्स ग्रुप, शाळा, शहरातील सामाजिक काम करणारे ग्रुप, महिला, आदींनी उत्स्फूर्त सहभाग घेत या राईडमध्ये जोश आणला. सकाळी सात वाजता सुरु झालेली ही राईड टेंबलाई उड्डाणपूल-केएसबीपी पार्क-सायबर चौक, आईचा पुतळा, राजारामपुरी बारावी गल्ली, टेंबलाई उड्डाणपूलमार्गे पुन्हा हॉटेल सयाजी येथे परतली.

या पूर्ण मार्गावर नागरिकांनी सहभाग होत सायकलपटूंना टाळ्या वाजवून प्रोत्साहित केले. या राईडच्या माध्यमातून कोल्हापूरवासीयांना आगळेवेगळे वातावरण अनुभवायला मिळाले. रवी सुतार स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थे चे व्हिडिओग्राफी विभागाचे प्रमुख यांचे सहकार्य लाभले.



कोल्हापूर शहरात 'लोकमत'तर्फे रविवारी आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड'मध्ये बालचिमुकल्यांसह युवक, युवती व आबालवृद्धांनी सहभाग घेऊन राईडमध्ये उत्साह पेरला. या सायकल राईडमुळे अवघं शहर सायकलवर अवतरल्यासारखे वाटत होते. छाया : नसीर अत्तार




'लोकमत'तर्फे रविवारी 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड'ची सुरुवात फ्लॅग ऑफने झाली. यावेळी मुकेशकुमार रक्षित, डॉ. संजय देशपांडे, अलोक शहा, आकाश मोरे, सूरज जेके, प्रवीण शर्मा, संजय भगत, डॉ. अनिरुद्ध पिंपळे, आकाश कोरगावकर उपस्थित होते. छाया : नसीर अत्तार

## सोनचाफ्याबरोबर पर्यावरणाचा सुगंध दरवळणार : डॉ. देशपांडे

पर्यावरणाला बळ देण्यासाठी ॲस्टर आधार हॉस्पिटल आणि सावली केअर सेंटर यांच्या वतीने प्रत्येक सायकलपटूला सोनचाफ्याचे रोप देण्यात आले. त्यांच्या या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळाला. सोनचाफ्याचे रोप घेण्यासाठीही सायकलपटूंनी गर्दी केली होती. हा सोनचाफा आम्ही वाढवून पर्यावरणाचा हा सुगंध सगळीकडे दरवळवू, असा निर्धार सायकलपटूंनी व्यक्त केला.

## जिल्हाधिकाऱ्यांचा जोश



जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी या राईडमध्ये सहभागी होत सायकलपटूंचा उत्साह द्विगुणित केला. 'लोकमत'ने पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेला उपक्रम प्रेरणादायी व 'ग्रीन कोल्हापूर'ला बळ देणारा असल्याचे जिल्हाधिकारी येडगे यांनी सांगितले.



लोकमत आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड' उपक्रमात हॉटेल सयाजीलाही छोटेसे योगदान देता आले याचा आनंद आहे. निरोगी आरोग्यासाठी सायकल राईड अत्यंत गरजेची आहे. या उपक्रमामधून पर्यावरणाचा संदेश तर दिलाच; पण आरोग्याची काळजी घेण्याबाबतही या सायकल राइडने खऱ्या अर्थाने जनजागृती केली आहे.

**मुकेशकुमार रक्षित,**
**जनरल मॅनेजर, हॉटेल सयाजी, कोल्हापूर.**

## 'भारत माता की जय'चा जयघोष

सीए असोसिएशन, पेठवडगाव येथील ट्रेल हंटर्स ग्रुप, विवेकानंद व कमला कॉलेज येथील मुलींचा एनसीसी विभाग यांसह जिल्ह्यातील विविध सायकल ग्रुप सहभागी झाले होते. सायकल राईड मार्गावर जय भवानी, जय शिवाजीचा गजर, 'भारत माता की जय'चा जयघोष करत सायकलपटूंनी ही राईड पूर्ण केली.




'लोकमत' तर्फे रविवारी आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड' मध्ये बालचिमुकले व प्रौढांनी सहभाग घेत पर्यावरणाचा संदेश दिला.